**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416004, MAHARASHTRA**
**PHONE**: EPABX – 0091-0231-2609000 DBEE Office: 0231-2609068
Engg. & Tech. Exam .Section: 0231-2609122 FAX: 0091-0231-2690655
Website: www.unishivaji.ac.in E-mail: coe@unishivaj.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–४१६००४, महाराष्ट्र
Estd. 1962
NAAC 'A' Grade
दूरध्वनी : (ईपीएबीएक्स) ००९१-०२३१-२६०९००० संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ कार्यालय : ०२३१-२६०९०६८
अभियांत्रीकी व तंत्रज्ञान परीक्षा विभाग : ०२३१-२६०९१२२ फॅक्स : ००९१-०२३१-२६९०६५५
वेबसाईट : www.unishivaji.ac.in ई मेल coe@unishivaji.ac.in

Ref.: - SU/EXAM/On Exam/ 165 Date : 11 SEP 2020

प्रति,

**1) मा. विभागप्रमुख/संचालक/ समन्वयक**
**पदवी व पदव्युत्तर अधिविभाग**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**
**2) मा. प्राचार्य /मा.संचालक**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये,**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**विषय : अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या ( अनुशेषासह) प्रात्यक्षिक/प्रकल्प/मौखिक परीक्षा घेण्याबाबत.**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात आदेशान्वये कळविण्यात येते की, कोव्हीड–19 चा प्रादूर्भावामुळे व तदअनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमध्ये शासन निर्देशानुसार आणि विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्याच्या (अनुशेषासह) प्रात्यक्षिक/मौखिक/प्रकल्प परीक्षा घेण्याबाबत विद्यापीठ अधिविभाग/संलग्नीत महाविद्यालयाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1) अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्याच प्रात्यक्षिक/मौखिक/प्रकल्प परीक्षा दि. 15 सप्टेंबर 2020 ते दि. 30 सप्टेंबर 2020 या कालावधीत आयोजित करुन सदरच्या परीक्षेचे विद्यार्थ्याना देण्यात आलेले गुण संगणक प्रणालीत भरण्यात यावेत. यासाठी आवश्यक ती लिंक दि. 15/09/2020 ते 01/10/2020 या कालावधीसाठी उपलब्ध करुन देण्यात येत असून सदरच्या कालावधीत गुण भरुन निश्चित (Confirm) करण्यात यावेत.

2) विद्यापीठ अधिकार मंडळांच्या मान्यतेनुसार प्रात्यक्षिक परीक्षा/मौखिक परीक्षा विद्यार्थ्याना थेट महाविद्यालयात न बोलविता तंत्रज्ञानाच्या मदतीने परीक्षा घेण्याची मुभा संबंधित अधिविभागप्रमुख/ संबधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांना देण्यात आलेली असून प्रात्यक्षिक परीक्षा/ मौखिक परीक्षा/प्रकल्प परीक्षा घेण्यासाठी Skype अथवा अन्य Meeting Apps अशा तत्सम पर्यायांचा वापर करण्यात यावा. सदरची परीक्षा घेताना सध्या असणाऱ्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या कमाल गुणामध्ये कोणताही बदल करण्यात येवू नये.

3) कोविड–19 साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्याच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येऊन तसेच विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित डोळयासमोर ठेवून परीक्षांची पध्दत अवलंबण्यात यावी.

4) विद्यार्थ्यांच्या आरोग्यास बाधा येऊ नये याकरिता परीक्षा घेण्यासाठी जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा.

5) परीक्षार्थीची कोणतीही तक्रार विद्यापीठात प्राप्त होणार नाही याची सर्वतोपरी दक्षता महाविद्यालय/अधिविभागाने घ्यावी.

कळावे.

आपला विश्वासू

प्र. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ